चिपळूण नगर परिषद

निविदा सुचना

(अभिलेख व भांडार विभाग)

चिपळूण नगर परिषदेचे उपयोगाकरीता खालील वर्णनाच्या नामांकीत कंपनीच्या वस्तुंचा पुरवठा करणेसाठी दोन लखोटा पध्दतीने सीलबंद निविदा मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | बयाणा रक्कम डीडी अथवा मुदत ठेव स्वरूपात | अंदाजित रक्कम | पुरवठादाराची पात्रता | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संगणक नग ६<br>१३२ कॉलम प्रिंटर नग २<br>८० कॉलम प्रिंटर नग ३ | ५,०००/- | २,५०,०००/- | १. दुकाने नोंदणी प्रमाणपत्र.<br>२. अनुभवाचा दाखला<br>३. कंपनीचा अधिकृत पुरवठादार प्रमाणपत्र.<br>४. वॅट नोंदणी प्रमाणपत्र. | १ महिना | ५००/- |
| २ | सर्व्हर नग १ (ऑपरेटींग सिस्टीम २००३ सह) | २,०००/- | ८५,०००/- | वरील प्रमाणे | १ महिना | १००/- |
| ३ | लेझर प्रिंटर नग १ | २,०००/- | ३५,०००/- | वरील प्रमाणे | १ महिना | १००/- |
| ४ | एलसीडी प्रोजेक्टर नग १ स्क्रीनसह | २,०००/- | ६५,०००/- | वरील प्रमाणे | १ महिना | १००/- |
| ५ | लॅपटॉप नग १ | २,०००/- | ३५,०००/- | वरील प्रमाणे | १ महिना | १००/- |

१. निविदा फॉर्म दिनांक २१/११/२००८ पर्यत म्यु.पल अभिलेख व भांडार विभागात सायंकाळी ५.०० वाजे पर्यत मिळतील.
२. परिपूर्ण सिलबंद निविदा दिनांक २६/११/२००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यत प्रशासकीय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षामध्ये ठेवलेल्या निविदा पेटीमध्ये टाकावयाची आहे.
३. प्राप्त निविदा धारकांच्या निविदा शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येतील.
४. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा टाकणे आवश्यक आहे.

उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
कामासंबधी माहिती नगर परिषद अभिलेख व भांडार विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या अभिलेख व भांडार विभागात मागणी केल्यास विनामुल्य उपलब्ध आहेत. किंवा नगर परिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल. कोणतेही निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहेत.

दिनांक :

मुख्याधिकारी

चिपळूण नगर परिषद, चिपळूण

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

## सविस्तर निविदा सुचना

१. डेस्कटॉप (desktop) संगणक ड्युवेल कोर प्रोसेसर, २.० जीएचझेड, मदरबोर्ड इंटेल ९४५/९४६, १ जीबी डीडीआर २ रॅम, १६० जीबी साटा हार्डडिस्क, डीव्हीडी रायटरट, एटीएक्स कॅबीनेट, एमएम की बोर्ड, ऑप्टीकल माऊस, १०/१०० लॅन कार्ड, १७ इंची एलसीडी टीएफटी कलर मॉनीटर किंवा त्यांचे समतुल्य तसेच २४ पीन १३२ कॉलम डॉटमेट्रीस प्रिंटर व ८० कॉलम डॉटमेट्रीस प्रिंटर पुरवावयाचे आहेत किंवा त्यांचे समतुल्य. तसेच सर्व संगणक ऑपरेटींग सिस्टीमसह, तसेच नगर परिषदेची संगणक प्रणाली इन्स्टॉलेशनसह चालू करुन देणेची आहे.

२. कॉड कोर इंटेल झिऑन प्रोसेसर, २.६६ जीएचझेड, मदरबोर्ड इंटेल रेड टेक्नॉलॉजी, २ जीबी डीडीआर २ रॅम, २५० + २५० जीबी साटा हार्डडिस्क, डीव्हीडी रायटर, एटीएक्स कॅबीनेट, एमएम की बोर्ड, ऑप्टीकल माऊस, १०/१०० लॅन कार्ड २, १७ इंची एलसीडी टीएफटी कलर मॉनीटर किंवा त्यांचे समतुल्य, सर्व्हरमध्ये ऑपरेटींग सिस्टीम चालू करून देणेचा आहे. नगर परिषदेचे संगणक प्रणाली चालू होणे आवश्यक आहे. तसेच जून्या सर्व्हरमधील नगर परिषद संगणक प्रणालीचा डेटा नवीन सर्व्हरमध्ये ट्रान्स्फर करून नवीन सर्व्हर चालू करून देणेचे आहे. तसेच लेझर प्रिंटरसाठी ड्युप्लेक्स प्रिंटींगची (पाठपोट छपाई) सुविधा व इन बिल्ट नेटवर्कीग सुविधा असणे आवश्यक आहे.

३. एलसीडी प्रोजेक्टर २००० ल्युमेन्सचा असणे आवश्यक आहे. तसेच सदरचा प्रोजेक्टर सुस्थितीत चालू करून देणे आवश्यक आहे. स्क्रीन ७ फुट बाय ८ फुट आवश्यक आहे.

४. लॅपटॉप इंटेल पी-४, १.८ जीएचझेड ड्युवेल कोर प्रोसेसर, इंटेल चिपसेट, इंटेल मदरबोर्ड, १ जीबी डीडीआर २ रॅम, १६० जीबी साटा हार्ड डिस्क, डीव्हीडी रायटर, कॅरी केससह किंवा त्यांचे समतुल्य देणे आवश्यक आहे.

५. सर्व साहित्याची कंपनी वॉरंटी देणे आवश्यक आहे.

६. निविदा धारकांनी बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.

७. निविदा फॉर्म लेखा विभागात आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.

८. यशस्वी ठेकेदार यांनी करारनाम्यासोबत अनामत रक्कम भरली नाही अथवा करारनामा विहीत मुदतीत केला नाही तर भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. करारनामा पूर्ण झाल्यावर यशस्वी ठेकेदारांची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत म्हणून वर्ग होईल.

९. यशस्वी ठेकेदार यांनी न. पा. ने मागणी केलेले संगणक व प्रिंटर अधिकृत कंपनीचे असणे आवश्यक आहे. याबाबत आवश्यकता वाटल्यास पुराव्याची मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक आहे.

१०. निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत न भरल्यास बयाणा रक्कम जप्त होईल. निविदा उघडल्यापासून १२० दिवसांत नगर परिषदेने काहीही न कळविल्यास निविदा धारकाला निविदा मागे घेता येईल व अशा वेळी बयाणा रक्कम परत मिळेल. निविदा दिनांकापासून १२० दिवसापर्यत वैध राहील.

११. अयशस्वी निविदा धारकांना निविदा नामंजूर झाल्याचे कळविल्यानंतर किंवा १२० दिवसांनंतर अर्ज केल्यानंतर अर्ज केल्यावर बयाणा रक्कम परत देण्यात येईल.

१२. निविदा स्विकृतीबाबत ठेकेदार यांना पत्राने कळविण्यात येईल.

१३. निविदा धारकांनी कामाची निविदेमध्ये पुरवठा करणाऱ्या वस्तुंची किंमत तसेच कंपनीचे नांव, मेक व त्यासंबधीचे माहिती पत्रक असल्यास निविदेसोबत जोडावे व किंमत अक्षरी लिहून सही करणे आवश्यक आहे. अक्षरी व आकडी यामध्ये फरक आढळल्यास दोन्हीमधील सर्वात कमी दर स्विकृत करण्यात येईल.

१४.निविदा सादर करण्याची पध्दत

१. निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.

२. निविदा लखोटा एक मध्ये कागदपत्रांची यादी व सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्या असल्यास लखोटा एक मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

३. भागीदारी फर्म असल्यास भागीदारी पत्राची सत्यप्रती लिपी व अधिकार पत्र जोडणे आवश्यक आहे.

४. दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव, ठेकेदाराचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.
आयकर पॅनकार्डच्या सत्यप्रती लिपी व वॅट रजिस्ट्रेशनचा दाखल्याची सत्यप्रत लिपी सोबत जोडणे आवश्यक आहे.

५. निविदेमध्ये दर टाकलेल्या कंपनीचे अधिकृत विक्रेते अथवा अधिकृत पुरवठादार किंवा उत्पादक असल्याबाबत आवश्यकतो कंपनीचा दाखला सत्यप्रती लिपी असणे आवश्यक आहे.

१५.निवदा उघडणे

९.१ निविदा उघडणेसाठी नेमलेल्या दिवशी प्रथम लखोटा क्रमांक १ उपस्थित ठेकेदारासमोर उघडणेत येईल. व त्यामध्ये कागदपत्रांची छाननी मुख्याधिकारी किंवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी करतील. व उपस्थित ठेकेदार यांचे आक्षेप यासंबधी खात्री करतील.

९.२ दुसरे दराचा सिलबंद लखोटा लखोटा क्रमांक १ मधील कागदपत्रे योग्य असल्याबद्दल मुख्याधिकारी अथवा मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांची खात्री पटल्यानंतरच उघडण्यात येईल.

९.३ निविदा लखोटा क्रमांक १ मधील कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्यास लखोटा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही. व तो निविदा धारकांला परत मिळणार नाही.

९.४ कामाचे बाबतीत किंवा कागदपत्राचे बाबतीत कोणताही बदल आवश्यक असल्यास त्याबाबत निविदा फॉर्म खरेदी करणारे ठेकेदार यांना पत्राने तसेच वर्तमान पत्रात त्याबाबत आवश्यकती शुध्दीपत्रक निविदा सादर करण्याच्या दिवसापूर्वी प्रसिध्द करणेत येईल.

९.५ निविदेसंबधी कोणतेही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास ते निविदेसोबत लखोटा क्रमांक १ मध्ये देणे आवश्यक आहे. मुख्याधिकारी यांचेवर कोणत्याही अटीची निविदा किंवा बेकायदेशिर अटी स्विकृत करण्याचे बंधन नाही.

१६.यशस्वी निविदा धारकांना निविदा मंजूरीनंतर योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक आहे.

१७.मंजूर निविदा धारकांना निविदा मंजूरीबाबत कळविल्यापासून १० दिवसांचे आंत करारनामा व करारनाम्यासोबत भरावयाची सुरक्षा अनामत रोखीने अथवा मुदत ठेवीने न भरल्यास निविदा अमान्य करून फेर निविदा अथवा अन्य निविदाधारकांची निविदा स्विकृत करावी लागल्यास फरकाची रक्कम संबधीत ठेकेदाराकडून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५१ अन्वये वसुल पात्र असेल.

१८.कोणतेही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतेही कारणे देण्यात येणार नाहीत.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद